पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली
दिनांक ०५/०१/२०१९

# वार्तापत्र

## ''हुंकार रॅलीच्या माध्यमातून महिलांचा नक्षलवादयांविरोधात आक्रोश''

गडचिरोली जिल्हयातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील महीला व शालेय विदयार्थीनींनी 'हुंकार रॅली' काढून नक्षलवादयांनी अत्यंत निर्घुणपणे हत्या केलेल्या निष्पाप आदिवासी समाजातील बेबी मडावी हिच्या खूनाचा निषेध व्यक्त करत नक्षलवादयांविरोधात रोष व्यक्त केला. बेबी मडावी रा. इरपनार ता. भामरागड जिल्हा गडचिरोली हि १२ व्या इयतेत शिक्षण घेत होती. आपल्या घरच्यांसोबत अतिशय आनंदाने व सुखाने राहणा-या बेबी मडावी हिला दिनांक २८/९/२०१८ रोजी रात्रौ भामरागड दलमच्या १० ते १२ नक्षलवादयांनी तिच्या राहत्या घरातून बळजबरीने बंदुकीचा धाक दाखवुन उचलून घेवून गेले. दिनांक २८/०९/२०१८ ते दिनांक ०५/१०/२०१८ रोजी भामरागड दलम ने तिला आपल्या सोबत फिरवून व तिच्यावर अनन्वयीत अत्याचार करुन दिनांक ०६/१०/२०१८ रोजी गोंगवाडयाकडे जाणा-या 'टी' पॉईंट जवळ तिच्या गळयावर व चेह-यावर चाकूने वार करुन तिचा अत्यंत निघृणपणे खुन केला.

या घटनेच्या निषेधार्थ गडचिरोली जिल्हयात ५८ ठिकाणी महिला व महाविदयालयीन युवतींनी 'हूंकार रॅली' चे आयोजन केले होते. या मध्ये जिल्हाभरातील अंदाजे २० ते २५ हजार महिला व महाविदयालयीन युवतींनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. या रॅली दरम्यान नक्षलवादयांनी बेबी मडावी हीचा अनन्वयीत अत्याचार करुन खुन केलेल्या कृत्याचा निषेध करत नक्षलवादी हे अल्पवयीन मुली व दुर्गम भागातील आदिवासी समाजावर अत्याचार करत असुन त्यांनी तात्काळ अत्याचार करणे थांबवावे. दलम मधील महिला नक्षलवादयांचा निषेध करत महिलांना जगण्याचा हक्क असल्याचा 'हुंकार' देत

नक्षलवादी मुर्दाबाद च्या घोषणा दिल्या. यावेळी ‘बेबी मडावी’ हिला ठिकठिकाणी श्रध्दांजली वाहण्यात आली.

**सायबर दिंडी**

दिवसें दिवस वाढत असलेल्या सायबर गुन्हयाची संख्या, सोशल मिडीयाच्या माध्यमातून पसरविल्या जाणा-या अफवा त्यातून होणारे जीवघेणे प्रकार याकडे जन सामान्यांचे लक्ष वेधले जावे तसेच शेतकरी व नागरिकांची होणारी आर्थिक फसवणुक थांबावी यासाठी त्यांच्यात जागृती व्हावी याकरिता मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांच्या संकल्पनेतून सायबर दिंडी चे जिल्हाभरातील विविध पोस्टे/उपपोस्टे/पोमके स्तरावर आयोजन करून तसेच ‘पथनाटय’ यांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये सोशल मिडीया तसेच नेट बॅंकींग, ऑनलाईन खरेदी- विक्री व्यवहार, एटीएम कार्ड संबंधित होणारे फसवणुकीचे गुन्हे यासंदर्भात जागृती करण्यात आली. याला मोठया प्रमाणावर नागरिकांचा प्रतिसाद मिळाला फसवणुकीचे गुन्हे, एटीएम फ्रॉड, सोशल मिडीयातून पसरविल्या जाणा-या अफवा यांना आळा बसावा व फसवणुकी पासुन नागरिकांनी सावधानता बाळगावी हा उद्देश या सायबर दिंडी व पथनाटयामागे असुन यामुळे निश्चितच सायबर गुन्हेगारीविषयी असलेल्या अज्ञानाबद्दल नागरिकांमध्ये जागृती होईल. असा विश्वास मा. पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी व्यक्त केला आहे. जिल्हाभरात अदयाप पर्यंत २० ठिकाणी या रॅलीच्या माध्यमातुन जागृती करण्यात येत असुन यामध्ये अंदाजे ४ ते ५ हजार नागरिकांनी सहभाग नोंदविला आहे.